म. टा. 29-ऑगस्ट 2016

# 'वाचनामुळे घडते व्यक्तिमत्त्व प्रगल्भ'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'सोशल मीडियाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांचा वाचनाकडील ओघ कमी होत चालला आहे. तरीही विद्यार्थ्यांनी साहित्य वाचनाची कास सोडू नये. वाचनामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना चालना मिळून व्यक्तिमत्त्वाला प्रगल्भता लाभते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात केवळ परीक्षार्थी न होता विद्यार्थ्यांनी ज्ञानार्थी बनले पाहिजे. ग्रंथालये ज्ञानमंदिरे आहेत, तर ग्रंथ हे आपले मित्र आहेत. ग्रंथवाचनाने विद्यार्थ्यांच्या आचार विचारांमध्ये आमूलाग्र बदल घडतो,' असे प्रतिपादन करवीर नगर वाचन मंदिरच्या ग्रंथपाल मनीषा शेणई यांनी केले.

'विद्यार्थ्यांमधील वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यामधील ग्रंथालयांची भूमिका' या विषयावर ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे सचिव डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, 'ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह अद्ययावत असावा, पण त्याचबरोबर ग्रंथपाल, ग्रंथालय सेवकांनीही तेवढ्याच तत्परतेने वाचकांना ग्रंथ देण्यास तत्पर असावे. ग्रंथालयातील वातावरण शांत, प्रसन्न, वाचनाला पूरक असावे. ग्रंथालयाद्वारे ग्रंथ-दिंडी, ग्रंथ प्रदर्शन यांसारखे उपक्रम हाती घेऊन विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील ग्रंथ वाचनाची गोडी लावावी.'

प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील म्हणाले, 'शेक्सपिअरचा 'हॅम्लेट', शिरवाडकरांचा 'नटसम्राट' यांसारखी पुस्तके विद्यार्थ्यांची वाट पाहत आहेत. विद्यार्थ्यांनी ही पुस्तके वाचून ज्ञान समृद्ध करावे.'

ग्रंथपाल ऊर्मिला कदम यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. डॉ. धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रेखा पंडित यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.